3301

क्रमांक:साप्रवि/डे-८/वशि/ /२०२२
(सामान्य प्रशासन विभाग)
जिल्हा परिषद भंडारा
दिनांक: 16 SEP 2022

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी
भंडारा.

विषय:-जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या अनुषंगाने नोंदणी केलेल्या उमेदवाराची प्रतिक्षा सुचीबाबतची प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत.

--oo--

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्याबाबत आवेदन व नोंदणी केलेल्या उमेदवाराची यादी bhandara.gov.in व bhandarazp.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबतची प्रेस नोट तयार करण्यात आली असुन स्थानिक वर्तमानपत्रात प्रकाशित करण्याबाबत कृपया कार्यवाही करावी.

सहपत्र:- प्रेस नोट

(विनय एस.मुन)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद भंडारा**

# प्रेस नोट

जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे पाल्यांना, कुटूंबातील पात्र सदस्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद भंडारा या कार्यालयास अर्ज केलेल्या उमेदवारांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रे, प्रमाणपत्र व इतर माहितीच्या आधारे अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेकरिता नोंदणी रजिष्टरवर नोंदणी केलेली आहे. प्राप्त अर्जाची छाननी-तपासणी करुन यादी तयार करण्यात आलेली असून यादी bhandara.gov.in व bhandarazp.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. तसेच एक प्रत जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

सबंधित अनुकंपा उमेदवारांनी उक्त यादी तपासुन घेवून माहितीत दुरुस्ती करणे व काही आक्षेप असल्यास सबळ पुराव्यासह लेखी अर्ज उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद भंडारा यांचे नांवाने दिनांक 30/९/2022 पर्यंत करावा. त्यानुसार आवश्यक ती सुधारणा व कार्यवाही करण्यात येईल. विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारचे आक्षेप प्राप्त न झाल्यास ही यादी अंतिम करण्यात येईल व याबाबत कोणतेही उजरतक्रार ऐकली जाणार नाही. याची सबंधीत उमेदवारानी नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा